जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ५२० दिनांक - १०/०७/२०२३**

**गुन्हे शाखा, युनिट-२, पुणे शहर**

# रेकॉर्ड वरील गुन्हेगारास केले जेरबंद, त्याचेकडुन दोन पिस्टल,०८ जिवंत काडतुस, सेंन्ट्रो कार असा मुद्देमाल हस्तगत

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे शहरातील खुन,खुनाचा प्रयत्न, रॉबरी, घरफोडी चोरी, चैन स्नॅचींग तसेच पाहीजे/फरारी, तडीपार आरोपीचा शोध घेवुन रेकॉर्ड वरील गुन्हेगार चेकींग करण्याबाबत महत्वाच्या सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने गुन्हे शाखा युनिट-२ प्रभारी अधिकारी,नंदकुमार बिडवई, म.सहा.पो.निरी.वैशाली भोसले, पो उप निरी.नितीन कांबळे व युनिट-२ कडील पोलीस अंमलदार असे युनिट-२ हद्दीत खाजगी वाहनाने पेट्रोलींग करीत असतांना,**युनिट-२ कडील पोलीस अमंलदार,गजानन सोनुने** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,सिल्व्हर रंगाच्या कार मध्ये दोन इसम बसलेले असुन,त्यांनी दोन गावठी पिस्टल बाळगले आहेत. सदर बातमीची माहिती युनिट-२ प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक,श्री. नंदकुमार बिडवई यांना सांगितली. त्यांनी त्याबाबत कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्याप्रमाणे दोन पथके तयार करून रोडचे बाजुला सापळा लावुन,बातमीप्रमाणे एक सिल्वर रंगाची कार समोरुन येत असल्याची खात्री झाल्याने युनिट-२ कडील अधिकारी व स्टाफच्या मदतीने गाडीसह त्यांना ताब्यात घेवुन, कारची झडती घेतली असता,गाडीचे डॅशबोर्ड मध्ये व त्यांचे अंगावर असे दोन लोखंडी धातूचे गावठी बनावटीचे पिस्टल मॅगझीनसह व ०८ जिवंत काडतुस असा एकुण १,७६,६००/- रु कि.चा मुद्देमाल मिळुन आला आहे. त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव **१)हनुमंत मोतीराम पवार,वय ३१ वर्षे,रा.संत तुकाराम नगर,येलवाडी,ता.खेड,जि.पुणे २) ऋषिकेश सुदाम बोत्रे,वय २९ वर्षे,रा.मु.पो.खाळुंद्रे,ता.खेड,जि.पुणे (अटक)** असे सांगितले. सदर आरोपी हे रेकॉर्डवरील आरोपी आहेत. आरोपी क्रं.२ याचेवर चाकण पो.स्टे. गु.र.नं.१०५६/२०२२ अन्वये अग्निशत्रे जवळ बाळगणे बाबत गुन्हा दाखल आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अप्पर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त, श्री.अमोल झेंडे,मा.सहा.पो.आयुक्त गुन्हे,श्री.सुनिल तांबे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. नंदकुमार बिडवई,गुन्हे शाखा,युनिट-२,पुणे शहर,सपोनि.वैशाली भोसले, विशाल मोहिते, पोउपनि नितीन कांबळे, राजेंद्र पाटोळे, पोलीस अंमलदार,गजानन सोनुने, उज्वल मोकाशी, अमोल सरडे, पुष्पेंद्र चव्हाण, संजय जाधव, उत्तम तारु, साधना ताम्हाणे, नामदेव रेणुसे, मोहसिन शेख, निखिल जाधव, शंकर नेवसे, विनोद चव्हाण व नागनाथ राख यांनी केलेली आहे.